माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ७८/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.वसंतराव बापुराव गावंडे,**
**मु.पो.काळी दौलतखान, ता.महागांव, जि.यवतमाळ**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**उपविभागीय अधिकारी, उमरखेड, ता.उमरखेड, जि.यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**उमरखेड, ता.उमरखेड, जि.यवतमाळ**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २९.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| १५.०२.२०१८ | निरंक | २६.०२.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.१९६२/२०१५ दि.१५.०२.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २९.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री.वसंतराव बापुराव गावंडे हे अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुभाष पाईकराव, नायब तहसिलदार व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.व्यंकट कंठीराम राठोड, उपविभागीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. १९६२/२०१५) मध्ये दिनांक १५.०२.२०१८ रोजी सुनावणी घेवून " (१) केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(१) नुसार ३० दिवसाच्या विहित मुदतीत उपलब्ध व देय्य ठरत असलेली माहिती अपिलार्थीला विलंबाने प्रदान केली असल्यामुळे कलम २०(१) नुसार

श्री.शिंदे व श्री.देशमुख अनुक्रमे तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना प्रत्येकी रु.५०००/- रुपयांची शास्ती करण्यात येते. (२) प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने दिनांक १२.०९.२०१४ रोजी त्यांचे स्तरावर प्राप्त झालेला अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज विलंबाने दि.११.०६.२०१५ रोजी निकाली काढला. म्हणून त्यांना याद्वारे भविष्यात अशा कर्तव्यच्युतीची पुनरावृत्ती करु नये, अशी ताकीद देण्यात येऊन त्याचे वरिष्ठ म्हणून जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना त्यांचे आगामी वार्षिक गोपनिय अहवालात तशा विलंबाची योग्य दखल घेण्यासाठी अशा आदेशाची प्रत पुरविण्यात येते. त्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल विहित मुदतीत द्यावा. (३) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचे मासीक वेतनातून उपरोक्त शास्तीची रक्कम एकमुस्तपणे विहीत पध्दतीने वसुल करुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या संबंधित लेखाशिर्षामध्ये चालानद्वारे जमा करावी व चालानच्या प्रतीसह अनुपालन अहवाल दि.२८.०६.२०१८ रोजी राज्य माहिती आयोगास सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलाश्या वरुन असे निदर्शनास येते की, आयोगाने द्वितीय अपील क्र १९६२/२०१५ मध्ये दि.१५.०२.२०१८ रोजी सुनावणी घेवून, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्रदान केली असल्याने श्री.शिंदे व श्री.देशमुख तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना प्रत्येकी रु.५०००/- रुपयांची शास्ती करण्यात येते तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा प्रथम अपील अर्ज विहीत मुदतीत निकाली न काढल्यामुळे सक्त ताकीद प्रदान केलेली आहे. वरील आदेशात पुर्नविलोकन करण्यासंबंधीत तत्कालीन नायब तहसिलदार श्री.सुधीर बाळासाहेब देशमुख यांनी दि.१५.०२.२०१८ रोजीच्या पारित आदेशात त्यांना सुनावणी मध्ये खुलासा करण्याबाबत संधी मिळाली नसल्याचे तसेच प्रस्तुत प्रकरणी त्यांचा कुठलाच दोष नसल्याचा सविस्तर खुलासा केला असून वरील आदेशात पुर्नविलोकन करुन दुरुस्ती करण्यासाठी विनंती अर्ज केला आहे. त्यामुळे वरील अर्ज हा प्रलंबीत असल्यामुळे शास्तीची रक्कम ही वेतनातून कपात करण्यात आली नसल्याचे अथवा शास्तीचा भरणा करण्यात आला नाही, असा खुलासा त्यांचेवतीने करण्यात आलेला आहे. तक्रारकर्ता श्री.वसंतराव गावंडे यांनी श्री.सुधीर देशमुख यांनी आयोगासमोर केलेल्या पुर्नविलोकन अर्ज फेटाळण्याची विनंती केली असून संबंधीतांना शास्ती कार्यवाही व माहिती अधिकार अधिनियमाचे तरतुदीनुसार इतर कार्यवाही करण्याची आग्रही विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणी श्री.सुधीर देशमुख यांनी पुर्नविचार /पुनर्रदुरुस्ती करण्याबाबत पुर्नविलोकन अर्ज सादर केला आहे. आयोगाला स्वत:च्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्याचे अधिकार नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाचा **Dominic S/O Gabriel Philip vs State Information**

**Commission, Nagpur या प्रकरणात दि.२६.०६.२०१९** रोजी दिलेल्या निर्वाळ्यात या आधिच स्पष्ट केलेले आहे. मात्र असे असले तरीही सबंधीत जन माहिती अधिकारी यांना ज्या विलंब कालावधीत शास्ती लागलेली आहे त्या कालावधीत ते कार्यरत नसल्यास त्या प्रकरणात मर्यादीत स्वरुपातील शुध्दीपत्रक अथवा ठळक दोषदुरुस्ती करणे आयोगाचे कार्यकक्षेतील बाब असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी श्री.वसंतराव गावंडे तसेच पुनर्विचार अर्ज दाखल करणारे श्री.सुधीर देशमुख यांना या प्रकरणी शुध्दीपत्रक काढण्याविषयी नोटीस जारी करण्यात येत आहे. तसेच श्री.सुधीर देशमुख यांचेवर बायपास शस्त्रक्रिया झाली असल्यामुळे प्रस्तुत प्रकरण ४ आठवड्यानंतर पुन्हा सुनावणीस ठेवण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

**वरील विवेचनाचे अनुषंगाने पुढील सुनावणी दिनांक १६ .१२.२०२३ रोजी ठेवण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २९.०८.२०२३**

जावक क्रमांक ३७८२ दिनांक 03/11/2023